# संगीतकारांची विशिष्ट शैली




प्रत्येक संगीतकाराची आपली विशिष्ट पद्धत असते. आपण रचलेल्या संगीतावर तो स्वतःची एक छाप उमटवीत असतो. मग ते गाणं कसं रचलं किंवा त्याची साथ कशी पण असली तरी गाणं ऐकताच त्या संगीतकाराची ओळख पटते.

उदाहरण म्हणून आपण माझ्या काही आवडत्या कलाकारांचे दाखले घेऊ.

मी मदन मोहनचा कट्टर चाहता आहे. त्यांची बहुतेक गाणी लताजींनी गायलेली आहेत. गाण्यात सतारीचा वापर प्रामुख्याने जाणवतो. पण मदनजींच्या सतारीचे वाजवणे गायकी अंगाने असते त्या मध्ये अशी काही जादू आहे की ती दुसऱ्या कोणत्याच रचनाकाराला जमलेली नाही. उस्ताद रैस खानसाहेब हे मदनजींचे खास सतारवादक होते.

आजकालच्या संगीतकारांमध्ये राजेश रोशन हे सुद्धा फार लोकप्रिय आहेत. त्यांच्या जुन्या रचना फारच मनोरंजक आहेत. गाण्यातील शब्दांचे अनुस्वार

काही ठिकाणी लांबवले आहेत हे स्पष्ट जाणवतं. उदा, *छोडो ये निगाहोंका इशारा* (इनकार) ह्यात *छो s डो ये निगा ss होंका इशा ss रा ss* ही आ काराची लांबी स्पष्ट जाणवते. ह्याशिवाय *दिलरुबा ss आ ss मे ss री बा ss होss मे ss आ ss* किंवा *नजारा ssना ss भेजा किसीने प्या ssरका* (देस परदेस) आणी *क्या मोसम है* (दूसरा आदमी) ह्यांचे संगीत फारच वैशिष्ट्यपूर्ण जाणवते.

राहूल देवांची तर एक जगावेगळीच पद्धत. त्यांनी आपल्या रचनेत गिटार आणि ठेकेदार मदल चा भरपूर वापर केलेला आहेच, पण मला सर्वात कौतुक वाटत ते म्हणजे त्यांनी वापरलेल्या off beat style चे. उदा, *तुम बिन जाऊ कहा* (प्यार का मोसम). ह्यातील परप्रत्येक ओळ तालाशी विसंगत आहे, आणि कधी कधी तालबध्द आहे ती केवळ अपवाद म्हणून. ह्यामुळे गाण्यातला ताजेपणा राहतो. तसंच *रैना बीत जाये* (अमर प्रेम) मध्ये *शाम ना आये* हे off beat आहे आणि त्यामुळे गाण्यात एक प्रकारची चटक आलेली आहे.

लक्ष्मीकांत प्यारेलाल चा ढोलकचा वापर तर शंकर जयकिशनचे Accordion फारच मोहक वाटते. कल्याणजी आनंदजी ची तालबध्दता आणी कोमल स्वरांचा वापर ह्यामुळे त्याच्या गाण्यात करूणरस सहजगत्या येतो उदा. *ओ साथी रे* (मुकद्दर का सिकंदर) ह्यातील अंतरातील *तेरे बीना मेरी, मेरे बीना तेरी* ह्या *मेरी* मधला पहिला कोमल स्वर खूपच जाणीवपूर्वक आहे.

नवीन संगीतकारांत प्रत्येक रसिकास ए आर रहमान चे कौशल्य जाणवते. कमीतकमी वाद्यांचा उपयोग, शार्प ट्रेबल, हेवी बेस आणि लांबून कोठून तरी उंच पट्टीत गाण्याचा आवाज ऐकू आला, की ओळखायचे ए आर रहमानचे संगीत आहे म्हणून

इस्माईल दरबार ची orchestration सुंदर असते पण शब्दांचा आणि वाक्प्रचारांचा पुनः पुनः वापर जरा जास्तच खटकतो. उदा. देवदास. प्रत्येक गाण्यात किती तरी वेळा परत परत तेच तेच शब्द जसं *डोला रे डोला रे डोला रे डोला* (आता बस झालं) किंवा *हमे मार डाला, हमे मार डाला, हमे* .. (आता पुढे काय, असे आपण उत्सुकतेने ऐकायला पुढे सरकतो, तर तेच, *मार डाला*) किंवा *हमेशा तुमको चाहा, और चाहा, और चाहा चाहा चाहा* (अरे बाबा बस्स झालं,समजलं।)

अर्थात असेही काहीं आहेत जे त्या त्या वेळी लोकांमध्ये जे खपतय तेच पचवतात आणि स्वतःच वैशिष्ठ असं काहीच दाखवत नाहीत. अनु मलिक चं संगीत ओळखणं फारच कठीण आहे आणि त्याबद्दल फार काहीं न लिहीणच बरं.

सर्व संगीत प्रेमिकांकडून त्यांचे अभिप्राय मला kingsachin@gmail.com वर कळविल्यास मला खूप आनंद होईल

सचिन राजे
www.sachinraje.com
अनुवादक -- Air Cmde (Retd.) गोपाळ गरूड